# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १०६-२३** **दिनांक :- ०४/०४/२०२३**

## चोरी व जबरी चोरी करणाऱ्या सराईत अरोपीतांस अटक करुन ०४ गुन्हयांची उकल आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २६/०३/२०२३ रोजी रात्रौ १०.१० वा. चे सुमारास फिर्यादी इरशाद मोहम्मद रफी सय्यद, रा. संतोषी माता मंदिराजवळ, आचोळे गाव, ता. वसई, जि. पालघर हे एव्हरशाईन सिटी ते संत सेवालाल नगरकडे जाणाऱ्या रत्यावरुन आचोळे गाव या दिशेने हातामध्ये फोन घेवुन पायी चालत जात असताना फिटनेस क्विन जिम चे समोर आले असता त्यांचे पाठीमागुन दोन अज्ञात इसम वय अंदाजे ३० ते ३५ हे मोटार सायकलवरुन येवुन फिर्यादी यांच्या हातातील मोबाईल फोन जबरीने खेचून चोरी करुन पळुन गेलेबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने आचोळे पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.नं. १८१/२०२३ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ अन्वये दिनांक २७/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वसई - नालासोपारा परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन चोरी व जबरी चोरी गुन्हयांत वाढ झाली होती. सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपींचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे आचोळे पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी १) विनायक पद्मा पुजारी, रा. रु नं. सी/ १०२, सुरभी व्हीला, द्वारका हॉटेल जवळ, मजेठीया पार्क, नालासोपारा पुर्व, अचोळे रोड, २) जनक महाविर सिंग साऊद, रा. रु नं. ए/२०३, नेमीनाथ कॉम्पलेक्स, नेमीनाथ नगर, आचोळे रोड, नालासोपारा पु. यांना ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. अटक आरोपीत यांचेकडे अधिक तपास करुन ४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून एकूण ७५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे | १८१/२०२३ | भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे |
| २. | आचोळे पोलीस ठाणे | १७७/२०२३ | भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ३. | आचोळे पोलीस ठाणे | ६११/२०२२ | भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | आचोळे पोलीस ठाणे | ७८/२०२३ | भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत सरोदे, पो.नि. सुधिर गवळी (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. यशपाल सुर्यवंशी, पो.उप.नि. सुहास म्हात्रे, संदिप भोसले, स.फौ. राजेश काळपुंड, पो.हवा. दत्तात्रय दाईंगडे, करण भवर, पोअंम. बालाजी संगमे, विनायक कचरे, मोहनदास बंडगर यांनी केली आहे.



-----oooo-----